जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार

१०.०८.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712


## 'जातीव्यवस्थेच्या पलीकडे जाऊन राष्ट्रभक्तीचा धागा जपणे गरजेचं'

### विकसित भारतासाठी रविंद्र चव्हाणांचं मोठं आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – संत शिरोमणी श्री गुरु रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर 'समरसता संकल्प अभियान' राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत संत रविदास महाराज यांची जन्मभूमी वाराणसी येथील पवित्र माती कलशात घेऊन निघालेली कलश यात्रा ७ ऑगस्ट रोजी नागपूर मार्गे छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झाली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या यात्रेचे स्वागत केले.

मुकुंदवाडी येथील संत रविदास मंदिरातून या कलश यात्रेला प्रारंभ झाला.त्यानंतर सायंकाळी कासलीवाल मैदान येथे कलश पूजन सोहळा पार पडला. याप्रसंगी संत रविदास महाराज तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणी नतमस्तक होत चव्हाण यांनी अभिवादन केले. यावेळी चव्हाण म्हणाले, 'संत रविदास महाराजांनी जाती-धर्म या व्यवस्थेच्या बाहेर जाऊन समता,बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.त्याच विचारांना पुढे नेत समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचा संकल्प या अभियानाच्या माध्यमातून करण्यात येत आहे'. 'भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी २०४७ पर्यंत..' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवायचे आहे. जाती-धर्माच्या भिंतींपलीकडे जाऊन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समरसतेचा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आणि सर्वांनी मिळून राष्ट्रभक्तीचा धागा जपणे आज गरजेचे आहे.'समरसता संकल्प अभियान'ही त्याच व्यापक विचाराची वाटचाल आहे,असे चव्हाण यांनी सांगितले.

### १०८ रुग्णवाहिकेसाठी ७ वेळा फोन

## २ तास वाट पाहिली, तरी आलीच नाही : गर्भवतीसह बाळाचा मृत्यू

### ५ जणांविरुद्ध गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**परभणी** – अपघातस्थळी कधीही वेळेवर न पोहोचणारी सरकारची तातडीची सेवा असलेली १०८ रुग्णवाहिकेचा आणखी एक प्रताप समोर आला आहे.

जिंतूर येथे ७ महिन्याच्या गर्भवती महिलेला वेळेत उपचार न मिळाल्याने तिच्यासह गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, या महिलेसाठी ७ वेळा १०८ या रुग्णवाहिकेस फोन केला, फोन करून २ तास उलटले तरीही रुग्णवाहिका न मिळाल्याने हा गंभीर प्रकार घडल्याचे सांगण्यात येते. परभणीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात घडलेल्या या घटनेनंतर १०८ रुग्णवाहिका सेवेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून शहरातील कोतवाली पो-लीस ठाण्यात रुग्णवाहिका चालक संबंधित डॉक्टर तसेच स्त्री रुग्णालयातील डॉक्टर अशा एकूण ५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्याच्या जिंतूर शहरातील साठे नगर येथील मरजीनाबी अमीन शेख या सात महिन्यांच्या गर्भवती महिलेला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने ती उपचारासाठी धडपडत होती. प्रकृती गंभीर असल्याने तातडीने नांदेडला हलवण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. त्यानंतर कुटुंबीयांनी १०८ या रुग्णवाहिकेसाठी वारंवार संपर्क साधला. कुटुंबीयांच्या आरोपानुसार, रुग्णवाहिकेसाठी तब्बल सात वेळा फोन करण्यात आला. मात्र, दोन तास उलटूनही रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली नाही. अखेर महिलेला परभणीच्या शासकीय स्त्री रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले.

मात्र, उपचारादरम्यान गर्भवती महिलेच्या गर्भातील बाळाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर महिलेच्या पतीने कोतवाली पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे रुग्णवाहिका चालक, संबंधित डॉक्टर आणि स्त्री रुग्णालयातील डॉक्टर अशा पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, आता या प्रकरणात रुग्णवाहिकेसाठी करण्यात आलेले फोन, कॉल रेकॉर्ड, रुग्णवाहिकेचे लोकेशन, चालकाची भूमिका आणि रुग्णालयातील उपचार प्रक्रिया तपासली जाणार आहे. परंतु याबाबत बोलण्यास आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी नकार दिलाय. मात्र, या घटनेमुळे पुन्हा एकदा शासनाच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. तर, १०८ रुग्णवाहिका फक्त देखावा आणि आरोग्य खात्यातील कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांसाठीच आहे का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

### थोडक्यात

#### नाशिकच्या गुजर हायस्कूलमध्ये गोलमाल, ११ शिक्षकां विरोधात गुन्हा दाखल




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिकच्या शैक्षणिक वतुर्ळात खळबळ उडवून देणारा बहुचर्चित शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास वेगाने सुरु आहे. या घोटाळ्यात सहभागी असलेले अनेक संशयित पोलिसांच्या ताब्यात आहे. अशातच देवळाली कॅम्प भागातील नामांकित डॉ.सुभाष गुजर हायस्कूलमध्ये बनावट व खोटी कागदपत्रे तयार करून वेतन निश्चिती करत संस्था आणि शासनाची फसवणूक केल्याचा ठपका ठेवत तब्बल ११ शिक्षकांविरुद्ध देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भरती परीक्षांविरोधात आंदोलन

## बॅरिकेड्स तोडून हजारो विद्यार्थ्यांचा विधानसभेवर मोर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**झारखंड** – राज्यातील विविध भरती परीक्षांमध्ये कथित गैरप्रकार झाल्याचा आरोप करत गेल्या १७ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवारी (दि.१०) तीव्र वळण मिळाले. हजारो नोकरी इच्छुक उमेदवारांनी हातात तिरंगा आणि मागण्यांचे फलक घेत झारखंड विधानसभेच्या दिशेने मोर्चा काढला. आंदोलकांनी बॅरिकेड्स हटवत पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. ९ दिवसांपासून उपोषण; रुग्णवाहिकेतून मोर्चात सहभाग

या आंदोलनात गेल्या ९ दिवसांपासून उपोषणाला बसलेले जेएलकेएम नेते देवेंद्र नाथ महतो हे प्रकृती खालावलेली असतानाही रुग्णवाहिकेतून मोर्चात सहभागी झाले. उपोषणामुळे त्यांचे वजन १०.५ किलोने घटल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी त्यांच्या हातात माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे छायाचित्र होते.

तिरंगा आणि फलक घेऊन विद्यार्थ्यांचा एल्गार हजारो आंदोलक हातात तिरंगा आणि विविध मागण्यांचे फलक घेऊन रस्त्यावर उतरले. भरती परीक्षांमधील कथित गैरप्रकारांची चौकशी, परीक्षा रद्द करणे आणि संबंधित आयोगांच्या कामकाजात सुधारणा करण्याच्या मागण्यांसाठी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली.

मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवशीच विधानसभेवर मोर्चा मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या ५१व्या वाढदिवशीच हा मोर्चा काढण्यात आला. धुर्वा येथील जुन्या विधानसभा संकुलाबाहेरून मोर्चाला सुरुवात झाली.

## 'पुराने पेडो का मजाक उडा रहे थे नये पौधे...'

### २४ तासांत नवनीत राणांचं दुसरं स्टेटस चर्चेत, रवी राणा-भाजप वादानंतर नेमका रोख कुणाकडे?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – अमरावतीच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या शाब्दिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार नवनीत राणा यांचं आणखी एक व्हॉट्सअॅप स्टेटस चर्चेत आलं आहे.

'पुराने पेडो का मजाक उडा रहेथे नये पौधे... इन्होने अभी तुफानो के झटके नही देखे....' असं स्टेटस नवनीत राणा यांनी ठेवलं आहे. विशेष म्हणजे, गेल्या २४ तासांत नवनीत राणा यांचं हे दुसरं स्टेटस चर्चेत आलं आहे. त्यामुळे या स्टेटसमधून नवनीत राणांचा रोख नेमका कोणाकडे आहे, याबाबत अमरावतीच्या राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आलं आहे.

हे स्टेटस पक्षातील स्वकीयांना उद्देशून आहे की विरोधकांना, याबाबत त्यांनी कोणतेही स्पष्ट संकेत दिलेले नाहीत. मात्र, आमदार रवी राणा आणि भाजप आमदारांमध्ये झालेल्या वादानंतर नवनीत राणा यांच्याकडून सातत्याने सोशल मीडियावर करण्यात येणाऱ्या पोस्टमुळे या चर्चांना अधिक हवा मिळाली आहे. २४ तासात नवनीत राणांचं दुसरं स्टेटस नवनीत राणा यांनी यापूर्वी आमदार रवी राणा यांच्या फोटोला कॅप्शन देत एक स्टेटस ठेवलं होतं. 'दुनिया कहती है खेल बदलना मुश्किल है, लेकिन मै खेल नही खेल खेलने वाले बदल देता हु....' या स्टेटसमधूनही नवनीत राणा यांनी नेमका कोणाला इशारा दिला, याबाबत राजकीय चर्चांना उधाण आलं होतं. त्यानंतर आता पुन्हा 'पुराने पेडो का मजाक उडा रहेथे नये पौधे... इन्होने अभी तुफानो के झटके नही देखे....' या आशयाचं स्टेटस समोर आल्याने अमरावतीच्या राजकीय वतुर्ळात चर्चांना आणखी वेग आला आहे.

## चालकांचे नियंत्रण सुटले अन रायगडमध्ये दोन एसटीचा भीषण अपघात, एक झाडावर आदळली, दुसरी रस्त्याच्या कडेला घसरली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – रायगडमध्ये एसटी बसचा भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. महाड-विन्हेरे रस्त्यावर कुर्ला घाटातील वळणावर हा अपघात घडला. या ठिकाणी दोन एसटी बसचा अपघात झाल्याची माहिती आहे.वळणावर दोन्ही बसच्या चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे प्राथमिक वृत्त आहे. अपघातानंतर एका एसटी बसची झाडाला धडक बसली. तर दुसरी एसटी बस रस्त्याच्या कडेला घसरल्याची घटना घडली.या अपघातात एसटी चालकासह सात ते आठ प्रवासी जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना तातडीने महाड येथील ट्रॉमा केअर युनिट रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.




# अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या वतीने 'जागतिक आदिवासी दिन' उत्साहात साजरा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या स्थानिक शाखेच्या वतीने आज 'जागतिक आदिवासी दिन' मोठ्या उत्साहात आणि पारंपारिक वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला नगरसेवक विजय चौधरी, परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष महेश वाडीवे आणि सामाजिक कार्यकर्ते आशिष पाटील, उमेश सांडे प्रामुख्याने उपस्थित होते. निसर्ग पूजक असलेल्या आदिवासी संस्कृतीचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी भव्य वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यात आला. मुख्य कार्यक्रमात क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या पूर्ण कृती पुतळ्याला पुष्पहारार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना जिल्हा उपाध्यक्ष महेश वाडीवे यांनी आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक विकासावर भर दिला. जल, जंगल आणि जमीन यांवर आदिवासींचा हक्क अबाधित राखण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याचे आवाहन त्यांनी केले. नगरसेवक विजय चौधरी, आशिष पाटील, उमेश सांडे यांनीही आदिवासी बांधवांना जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देत समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली. त्यानंतर पाहुण्यांसोबत, राजेश धुर्वे, मनीष चक्रपाणी, विरेंद्र परतेती, हितेश धुर्वे, निलेश युवनाते, संजय मरस्कोल्हे, अजय उईके आणि उपस्थित नागरिकांच्या हस्ते विविध वृक्षांची रोपे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

# मराठा आरक्षणाच्या सुनावणीला फटका बसणार? न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांची कोलकाता हायकोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तीपदासाठी शिफारस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्राच्या राजकारणासोबतच राज्यातील लाखो मराठा समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मराठा आरक्षणाच्या प्रकरणाबाबत मोठी घडामोड समोर आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र व्ही. न्यायमूर्ती घुगे यांची कलकत्ता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्यास त्याचा सध्या सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या सुनावणीच्या गतीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कारण मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये देण्यात आलेल्या १० टक्के आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या अध्यक्षतेखालील विशेष पूर्णपीठासमोर सुनावणी सुरू आहे. महाराष्ट्र सरकारने २०२४ मध्ये मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय अधिनियम केला.

## सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी शाखेत

# आरोग्य शिबिर : ११० खातेदारांची तपासणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना सहज आणि मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटीच्या वरुड शाखेत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. विभागीय व्यवस्थापक मनिष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले.

या शिबिरामध्ये सहभागी खातेदारांची सामान्य आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच रक्तदाब, रक्तातील साखरेची (शुगर) तपासणी आणि इतर आवश्यक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. आरोग्यविषयक समस्या असलेल्या नागरिकांना डॉक्टरांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. या आरोग्य शिबिरासाठी सहयोग हॉस्पिटल, नागपूर येथील डॉक्टरांची विशेष उपस्थिती होती. डॉक्टरांनी उपस्थित खातेदारांची तपासणी करुन आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले. शिबिराला खातेदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकुण ११० खातेदारांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. आरोग्य तपासणीसाठी मोठ्या संख्येने खातेदार उपस्थित राहिल्याने शिबिराचा उद्देश सफल झाल्याचे दिसून आले.

यावेळी शाखा व्यवस्थापक किशोर चौधरी, सर्व स्वयंसेविका, शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. नियमित आरोग्य तपासणी आणि वेळेवर आजारांचे निदान यामुळे नागरिकांना आरोग्याबाबत अधिक जागरुक होण्यास मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## भारतीय डाक विभागाच्या वतीने

# राष्ट्रीय स्तरावरील 'ढाई आखर' पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – भारतीय डाक विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील 'ढाई आखर' पत्रलेखन स्पर्धा २०२६-२७ आयोजित करण्यात आली आहे.

यावर्षी स्पर्धेची संकल्पना माझ्या वसुंधरेला पत्र : निसर्गाचे रक्षण करण्याचे माझे वचन अशी असून, पर्यावरण संवर्धनाचा संदेश आपल्या लेखणीतून व्यक्त करण्याची संधी या स्पर्धेतुन मिळणार आहे.

या स्पर्धेत वगटड शहर व परिसरातील विद्यार्थी, युवक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्तर हेमंत शिंगरवाडे यांनी केले आहे. स्पर्धकांना आंतरदेशीय पत्राच्या माध्यमातून कमाल ५०० शब्दांत तर लिफाफा पत्राच्या माध्यमातून कागदावर कमाल १ हजार शब्दांत आपले विचार मांडता येणार आहेत. पत्र स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिणे आवश्यक आहे. स्पर्धेतील विजेत्यांसाठी महाराष्ट्र वृत्त स्तरावर प्रथम २५ हजार, द्वितीय २० हजार व तृतीय ५हजार, तर राष्ट्रीय स्तरावर प्रथम ५० हजार, द्वितीय २५ हजार व तृतीय १० हजार अशी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

इच्छुक स्पर्धकांनी आपली पत्रे वरुड पोस्ट ऑफिसमधील 'ढाई आखर' विशेष लेटर बॉक्समध्ये किंवा जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जमा करावीत. स्पर्धेची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ आहे. आजच्या डिजिटल युगात पत्रलेखनाची परंपरा जपतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रत्येकाच्या मनापर्यंत पोहोचविण्याची ही उत्तम संधी आहे. परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन हेमंत शिंगरवाडे यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

# नाशिकमध्ये भूकंपाचे धक्के : काही घरांना तडे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**लासलगाव** – नाशिक जिल्ह्यात शनिवारी रात्री १० वाजून १ मिनिटाच्या सुमारास ४.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला. त्यानंतर रविवारी पहाटे ५ वाजून ३३ मिनिटांनी ३.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा धक्का जाणवला. सुमारे २० ते २२ सेकंद जमीन थरथरल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र काही घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत.

राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या माहितीनुसार, भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली सुमारे पाच किलोमीटर खोलीवर दिंडोरी तालुक्यातील भानवड-शिंदपाडा परिसरात असल्याचे प्रशासनाने सांगितले. नाशिक शहरासह सुरगाणा, पेठ, कळवण, दिंडोरी, निफाड, देवळा, चांदवड, सिन्नर आदी तालुक्यांतील अनेक गावांना धक्के जाणवले.

सुरगाणा तालुक्यातील भादर गावातील काही घरांच्या भिंतींना तडे गेले. दिंडोरी तालुक्यातील ननाशी परिसरातही घरांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. ननाशी भागात गेल्या पंधरा दिवसांत चार वेळा भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. रमाकांत शार्दुल यांच्या घराच्या भिंतीला तडे गेल्याचे सांगण्यात आले.

# कोल्हापूरची हद्दवाढ गरजेची : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**कोल्हापूर** – कोल्हापूर शहराचा विकास करायचा असेल तर शहराची हद्दवाढ करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केले.

येथे झालेल्या कार्यक्रमात फडणवीस म्हणाले की, आम्हाला कोल्हापूरकरांनी दिले आहे. त्यामुळे या सगळ्या नेत्यांना सांगतो, काही काळजी करू नका, यापू-र्वीही कोल्हापूरमध्ये कधी कमी पडू दिलं नाही. यापुढेही कमी पडू देणार नाही, पण यात एक गोष्ट नक्की आहे हद्दवाढ करणं फार गरजेचं आहे. हद्दीबाहेरच्या लोकांच्या काही अडचणी आहेत, पण मी लोकप्रतिनिधींना सांगतो, १०० टक्के त्यांच्या अडचणी मी सोडवून देतो, असे आश्वासन त्यांनी दिले.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आमदार राजेश क्षीरसागर तसेच कोल्हापूर मनपा महापौर रुपाराणी निकम यांनी कोल्हापूर हद्दवाढीचा मुद्दा उपस्थित केला होता. आपल्याला कोल्हापूरला अधिक सुनियोजित करायचंय फडणवीस म्हणाले, आज हायकोर्ट आलं, आता त्या हायकोर्टाला शेंडा पार्कला ७५ एकर जागा आपण देत आहोत. त्यामुळे या सगळ्या गोष्टी आपण करत आहोत. त्यामुळे मला विश्वास आहे की पुढच्या काळामध्ये शहराकरिता जो-जो विचार आपण सगळ्यांनी केला असेल, तो टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यासाठी आम्ही पूर्ण याठिकाणी प्रयत्न करू, हा विश्वास मी आपल्याला देतो, असे ते म्हणाले.

## स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे

# इंग्रजी संभाषण, इंग्रजीतील संवादकौशल्य विशेष प्रशिक्षण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे प्राध्यापक विकास कार्यक्रम अंतर्गत प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे इंग्रजी संभाषण तसेच इंग्रजीतील संवादकौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने विशेष प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कॉलेजच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांचे मार्गदर्शनात या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी प्रा.दिपाली राऊत यांनी ९ जून ते २५ जून या कालावधीत मार्गदर्शक म्हणुन कार्य करत इंग्रजी भाषेतील प्रभावी संवाद, दैनंदिन संभाषण, उच्चार, शब्दसंपदा आणि आत्मविश्वासपूर्वक सादरीकरण यांसारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा सहभागी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना मोठा लाभ झाला.

या प्रशिक्षण उपक्रमात महाविद्यालयातील प्रा.विजय ठाकरे, प्रा.अनुप बेले, प्रा.चेतन गणोरकर, प्रा.राहुल शिवारे, प्रा.सौरव आकोटकर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.राजकुमार वानखडे, प्रा.प्रफुल्ल बहुरुपी, प्रा.संजीवनी बारस्कर, प्रा.आलिया खान, प्रा.माधवी घोरमाडे, प्रा.साक्षी राठी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सुरज रामटेके, शीतल इंगळे व नितीन भुसारी यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या उपक्रमामुळे सहभागींच्या इंग्रजी संभाषण कौशल्यात तसेच व्यावसायिक संवादक्षमतेत लक्षणीय वाढ होण्यास मदत झाली.

महाविद्यालयात प्राध्यापकांच्या सर्वांगीण व्यावसायिक विकासासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याची माहिती कॉलेज व्यवस्थापनाने दिली.

## शिपाई पदाकरीता नियुक्ती आदेश न दिल्याच्या निषेधार्थ

# स्वातंत्र्य दिनापासुन दिक्षित बसणार आमरण उपोषणावर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – पंचायत समिती वरुड अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत जामगांव (खडका) येथे नियमानुसार घेण्यात आलेल्या शिपाई भरती परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण होऊनही नियुक्ती आदेश न मिळाल्याने अन्यायग्रस्त उमेदवार दीक्षित वानखडे हे येत्या ५ ऑगस्टपासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसण्याचा ईशारा एका निवेदनाव्दारे दिला आहे.

वरिष्ठांना पाठविलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, जामगांव (खडका) ग्रामपंचायतीने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी शिपाई पदासाठी नियमानुसार लेखी परीक्षा घेतली होती. या परीक्षेत एकूण २१ उमेदवारांनी सहभाग घेतला होता. परीक्षेचा निकाल व्हिडिओ रेकॉर्डिंग करुन सरपंच, उपसरपंच , ग्राम सेवक, विस्तार अधिकारी तसेच इतर ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थित जाहीर करण्यात आला, ज्यामध्ये दीक्षित वानखडे हे सर्वाधिक गुण मिळवुन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. मात्र काही उमेदवारांनी तक्रार केल्याचे कारण दाखवित ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांनी त्यांना नियुक्ती पत्र देण्यास टाळाटाळ केली.

या तक्रारींच्या चौकशीसाठी पंचायत समिती विस्तार अधिकारी रामटेके यांनी चौकशी केली. त्यांनी ४ ऑगस्ट २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालात उत्तीर्ण उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यास कोणतीही हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते तसेच या प्रकरणी गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केल्यानंतर घेतलेल्या विविध सुनावण्यांमध्ये नियमानुसार शिपाई पदाची यादी जाहीर करुन ४ वेळा नियुक्ती आदेश पत्र देण्याचे निर्देश देण्यात आले होते परंतु ग्रामपंचायत कडून अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. पंचायत समिती यांचा शासकीय अहवाल तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अमरावती यांचे स्पष्ट आदेश असूनही ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांच्या मनमानी कारभारामुळे गेल्या जवळपास १८ महिन्यांपासून आपल्याला नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले असून हा आपल्यावर तीव्र अन्याय असल्याचा आरोप दीक्षित वानखडे यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाविरुद्ध एल्गार पुकारत त्यांनी स्वातंत्र्यदिनी म्हणजेच १५ ऑगस्ट २०२६ पासून पंचायत समिती समोर आमरण उपोषणाला बसण्याचा निर्धार केला आहे.

# संपादकीय

{ नशिबाने जे दिलंय त्यात आनंदी राहा, दुसऱ्याचं कधीही हिसकावू नका. }


## क्षणिक समाधानाच्या मागे धावणारा माणूस

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात माणसाच्या गरजा वाढल्या आहेत, अपेक्षा वाढल्या आहेत आणि त्या पूर्ण करण्याची घाईही वाढली आहे. एखादी गोष्ट मिळाल्यानंतर काही क्षणांसाठी मिळणारे समाधान म्हणजे 'ऋीरींळषळलरींळेप' होय. मराठीत त्याला तृप्ती, समाधान किंवा इच्छापूर्तीचे सुख असे म्हणता येईल. माणसाच्या जीवनात समाधानाची भावना आवश्यक असली, तरी प्रत्येक इच्छा तात्काळ पूर्ण झाली पाहिजे, अशी मानसिकता निर्माण झाली तर त्याचे गंभीर सामाजिक आणि मानसिक परिणाम होऊ शकतात. पूर्वी एखादी वस्तू मिळवण्यासाठी माणूस प्रतीक्षा करायचा. बचत करायचा, मेहनत करायचा आणि अनेकदा अनेक महिने एखाद्या गोष्टीची वाट पाहायचा. त्यामुळे ती वस्तू मिळाल्यानंतर त्याला तिची किंमत जाणवायची. आज मात्र 'आत्ता हवे आणि लगेच हवे' ही मानसिकता वाढत आहे. मोबाईलवर एका क्लिकवर वस्तू मागवता येते, मनोरंजन काही सेकंदांत उपलब्ध होते, माहिती क्षणार्धात मिळते आणि सोशल मीडियावर प्रतिक्रिया देखील ताबडतोब मिळते. या सततच्या तात्काळ समाधानामुळे माणसाची प्रतीक्षा करण्याची क्षमता कमी होत चालली आहे. विशेषतः डिजिटल युगाने 'क्षणिक समाधान' ही संकल्पना अधिक तीव्र केली आहे. सोशल मीडियावर एखादा फोटो किंवा व्हिडिओ पोस्ट केल्यानंतर मिळणाऱ्या प्रतिक्रिया, लाईक्स आणि कमेंट्समुळे मनाला तात्पुरते समाधान मिळते. मात्र हे समाधान कायमस्वरूपी नसते. काही वेळाने पुन्हा नवीन प्रतिक्रिया, नवीन पोस्ट किंवा नवीन मनोरंजनाची गरज भासू लागते. अशा प्रकारे माणूस एका न संपणाऱ्या चक्रात अडकतो. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या जीवनावरही दिसून येतो. अभ्यास, वाचन किंवा एखादे कौशल्य आत्मसात करण्यासाठी सातत्य, संयम आणि मेहनत आवश्यक असते. त्यातून मिळणारे यश उशिरा मिळते. परंतु मनोरंजन, गेम्स किंवा सोशल मीडिया यामधून लगेच आनंद मिळतो. त्यामुळे काही वेळा कठीण कामापेक्षा सहज उपलब्ध होणाऱ्या मनोरंजनाकडे मन अधिक आकर्षित होते. यामुळे एकाग्रता कमी होणे, वेळेचे नियोजन बिघडणे आणि दीर्घकालीन उद्दिष्टांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता वाढते. याच मानसिकतेचा संबंध आजच्या वाढत्या उपभोगवादाशीही आहे. बाजारपेठ माणसाच्या इच्छांचा सतत विस्तार करत आहे. कालपर्यंत आवश्यक नसलेली वस्तू आज अत्यावश्यक वाटू लागते. जाहिराती आपल्याला सांगतात की नवीन वस्तू घेतल्याने आपले जीवन अधिक आनंदी, सुंदर किंवा यशस्वी होईल. परिणामी गरज आणि इच्छा यातील फरक धूसर होत जातो. वस्तू मिळाल्यानंतर काही काळ आनंद मिळतो; मात्र त्यानंतर पुन्हा नवीन वस्तूची इच्छा निर्माण होते. समाधानाचा शोध बाह्य वस्तूंमध्ये घेण्याची ही प्रवृत्ती माणसाला अंतर्गत शांततेपासून दूर नेऊ शकते. "Gratification' ही भावना स्वतःमध्ये चुकीची नाही. एखादे उद्दिष्ट पूर्ण केल्यानंतर मिळणारे समाधान हे माणसाला पुढे जाण्याची प्रेरणा देते. परीक्षेत चांगले गुण मिळाल्यानंतर होणारा आनंद, मेहनतीने एखादे कौशल्य शिकल्याचे समाधान किंवा एखाद्याला मदत केल्यानंतर मिळणारी आत्मिक शांतता ही सकारात्मक समाधानाची उदाहरणे आहेत.




# संत नामदेव महाराज : भक्तीच्या वाटेवरून मानवतेचा संदेश देणारे संत

महाराष्ट्राच्या संतपरंपरेला समृद्ध आणि व्यापक करणाऱ्या संतांमध्ये संत नामदेव महाराज यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भक्ती, समता, प्रेम, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश आपल्या अभंगांमधून समाजापर्यंत पोहोचविणारे संत नामदेव महाराज हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित राहिले नाहीत, तर त्यांच्या विचारांचा प्रभाव पंजाबसह उत्तर भारतातही पोहोचला. त्यांच्या भक्तीमध्ये आडंबर नव्हते, तर मनापासून केलेली ईश्वरभक्ती आणि माणसामाणसांतील प्रेमाला सर्वोच्च स्थान होते.




संत नामदेव महाराजांचा जन्म इ.स. १२७० च्या सुमारास नरसी-बामणी येथे झाला, असे मानले जाते. त्यांचे वडील दामाशेटी आणि आई गोणाई. लहानपणापासूनच नामदेव महाराजांची पांडुरंगावर अतूट श्रद्धा होती. पंढरपूरच्या विठ्ठलाशी त्यांचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. विठ्ठल हा केवळ मंदिरातील देव नसून आपल्या जीवनाचा सखा आहे, अशी त्यांची भावना होती. त्यांच्या अभंगांमधून विठ्ठलाशी असलेले हे प्रेमळ नाते सतत जाणवते.

संत नामदेव महाराजांच्या काळात समाजामध्ये जातिभेद, उच्च-नीचता आणि धार्मिक कर्मकांडांचे प्राबल्य होते. समाजातील मोठा वर्ग सामाजिक विषमतेचा सामना करत होता. अशा परिस्थितीत नामदेव महाराजांनी भक्तीचा मार्ग सर्वांसाठी खुला असल्याचा संदेश दिला. ईश्वरप्राप्तीसाठी जन्म, जात किंवा सामाजिक प्रतिष्ठा आवश्यक नसून शुद्ध मन आणि खरी भक्ती आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या आचरणातून मांडला.

त्यांच्या भक्तीमध्ये केवळ वैयक्तिक मोक्षाचा विचार नव्हता. त्यांच्या अभंगांतून समाजजीवनाचे प्रतिबिंब दिसते. सामान्य माणसाच्या सुख-दुःखांशी जोडलेली भाषा आणि सहज समजणारे शब्द यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनापर्यंत पोहोचले. त्यांनी भक्तीला लोकभाषेचा आधार दिला आणि अध्यात्म सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाशी जोडले.

संत नामदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांची मैत्री महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील महत्त्वाचा अध्याय आहे. ज्ञानेश्वर महाराज, निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई आणि नामदेव महाराज यांच्या सहवासातून भक्ती आणि ज्ञानाचा सुंदर संगम घडला. संत नामदेव महाराजांनी संत ज्ञानेश्वर महाराजांसोबत तीर्थयात्रा केल्याचा उल्लेख संतपरंपरेत आढळतो. या सहवासामुळे त्यांच्या भक्तीला व्यापक आध्यात्मिक दृष्टिकोन मिळाला. नामदेव महाराजांनी महाराष्ट्राबाहेरही भ्रमण केले. त्यांच्या विचारांचा आणि भक्तीचा प्रभाव उत्तर भारतात पोहोचला. पंजाब प्रदेशात त्यांच्या कार्याची विशेष आठवण आढळते. त्यांच्या रचनांपैकी काही रचना श्री गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संत नामदेव महाराज हे महाराष्ट्राच्या संतपरंपरेपुरते मर्यादित न राहता भारतीय भक्तीपरंपरेतील महत्त्वाचे संत ठरतात.

त्यांच्या साहित्याची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची सहजता. सामान्य माणसाला समजेल अशा भाषेत त्यांनी अध्यात्म सांगितले. देव शोधण्यासाठी केवळ बाह्य कर्मकांड करण्याची गरज नाही; ईश्वर आपल्या अंतःकरणात आहे, हा भाव त्यांच्या भक्तीत दिसतो. माणसाच्या अंतःकरणातील प्रेम, श्रद्धा आणि प्रामाणिकपणा यांना त्यांनी महत्त्व दिले.

आजच्या काळात संत नामदेव महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेमुळे समाज मोठ्या वेगाने बदलत आहे; मात्र जातीय भेदभाव, सामाजिक विषमता, द्वेष आणि धार्मिक संघर्ष यांसारख्या समस्या अद्याप पूर्णपणे संपलेल्या नाहीत. अशा वेळी संत नामदेव महाराजांचा समतेचा आणि बंधुभावाचा संदेश समाजाला दिशा देऊ शकतो. आज समाजात प्रसिद्धी, पैसा आणि प्रतिष्ठेला मोठे महत्त्व मिळाले आहे. सोशल मीडियाच्या युगात माणूस बाह्य जगाला प्रभावित करण्याच्या प्रयत्नात असतो; मात्र अंतर्मनातील समाधान आणि शांतता हरवत चालली आहे. संत नामदेव महाराजांची भक्ती आपल्याला अंतर्मुख होण्याचा संदेश देते. माणसाने स्वतःच्या मनाचा शोध घेतला आणि दुसऱ्याच्या दुःखाशी आपले नाते जोडले, तर समाज अधिक संवेदनशील होऊ शकतो.

नामदेव महाराजांच्या विचारांमध्ये 'माणूस' हा केंद्रबिंदू आहे. देवभक्ती आणि मानवसेवा यांच्यात त्यांनी भेद केला नाही. देवावर प्रेम करायचे असेल तर त्याच्या निर्मितीवरही प्रेम केले पाहिजे, ही भावना त्यांच्या संतविचारातून दिसते. त्यामुळे त्यांची भक्ती ही केवळ मंदिरातील पूजा न राहता समाजाशी जोडणारी शक्ती बनते.

त्यांच्या अभंगांनी मराठी साहित्यालाही मोठे योगदान दिले. अभंग हा प्रकार सामान्य लोकांच्या जीवनाशी जोडला गेला. नामदेव महाराजांच्या रचनांमधून भक्ती, आत्मचिंतन, विठ्ठलप्रेम आणि सामाजिक जाणिवा यांचा सुंदर मिलाफ दिसतो. त्यांच्या साहित्यामुळे मराठी भक्तिसाहित्यात भावनिक आणि आध्यात्मिक समृद्धी आली.

संत नामदेव महाराजांची परंपरा आजही वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून जिवंत आहे. आषाढी आणि कार्तिकी वारीच्या निमित्ताने लाखो वारकरी पंढरपूरकडे जातात. हातात टाळ-मृदुंग, मुखी विठ्ठलाचे नाम आणि मनात समतेची भावना घेऊन चालणारी ही वारी संतांच्या विचारांचीच जिवंत परंपरा आहे. वारीमध्ये श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, विविध सामाजिक स्तरातील लोक एकत्र येतात. हीच समतेची भावना संत नामदेव महाराजांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करते.

आजच्या तरुण पिढीने संत नामदेव महाराजांचा अभ्यास केवळ धार्मिक किंवा ऐतिहासिक दृष्टिकोनातून न करता सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातूनही करणे गरजेचे आहे. त्यांच्या जीवनातून श्रद्धा आणि विवेक, भक्ती आणि मानवता, परंपरा आणि सामाजिक समता यांचा सुंदर समन्वय शिकता येतो. परिस्थिती कितीही कठीण असली तरी सकारात्मक विचार, श्रद्धा आणि प्रामाणिक आचरण यांच्या बळावर जीवनाला अर्थ देता येतो, हा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो.

संत नामदेव महाराजांचे मोठेपण त्यांच्या चमत्कारांच्या कथांमध्ये नसून माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणाऱ्या त्यांच्या विचारांमध्ये आहे. त्यांनी भक्तीला लोकांपर्यंत नेले, देवाला सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडले आणि समाजाला प्रेम, समता व बंधुभावाचा मार्ग दाखविला.

आज समाजात वाढत असलेला द्वेष, असहिष्णुता आणि विभाजनाची मानसिकता पाहता संत नामदेव महाराजांचा संदेश पुन्हा नव्याने समजून घेण्याची गरज आहे. देवाच्या नावाने माणसामाणसांत भिंती उभ्या करण्याऐवजी माणुसकीच्या नावाने त्या भिंती पाडणे, हाच त्यांच्या संतविचारांचा खरा अर्थ आहे. संत नामदेव महाराजांची भक्ती म्हणजे केवळ विठ्ठलाचे नामस्मरण नाही; ती मन शुद्ध करणारी, समाज जोडणारी आणि माणसाला माणसाशी जोडणारी जीवनदृष्टी आहे. म्हणूनच शेकडो वर्षे उलटून गेल्यानंतरही त्यांच्या अभंगांचा नाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घुमत आहे आणि त्यांच्या विचारांचा प्रकाश आजच्या समाजालाही मार्गदर्शन करत आहे.

# आंदोलन : लोकशाहीचा आवाज की संघर्षाचे अस्त्र?

लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, अन्यायाविरोधात आवाज उठविण्याचा आणि आपल्या मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा अधिकार आहे. या अधिकारातूनच 'आंदोलन' किंवा 'निषेध' ही लोकशाहीतील महत्त्वाची प्रक्रिया जन्माला आली. समाजात एखाद्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असेल, एखाद्या घटकावर अन्याय होत असेल किंवा शासनाच्या निर्णयाबाबत असहमती असेल, तर शांततामय मार्गाने आपली भूमिका मांडणे हे नागरिकांच्या लोकशाही सहभागाचे लक्षण आहे. त्यामुळे आंदोलनाकडे केवळ विरोधाचे साधन म्हणून न पाहता, सामाजिक बदल घडवून आणणारा लोकशाहीचा आवाज म्हणून पाहण्याची गरज आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पाहिला तर आंदोलनाचे महत्त्व स्पष्टपणे जाणवते. महात्मा गांधींनी सत्याग्रह, असहकार आणि अहिंसक आंदोलनाच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनमत संघटित केले. या आंदोलनांमध्ये सामान्य नागरिकांचा सहभाग वाढला आणि स्वातंत्र्याची भावना देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली. त्यामुळे आंदोलन हे केवळ रस्त्यावर उतरून घोषणा देण्यापुरते मर्यादित नसते; ते समाजातील असंतोषाला संघटित आणि विधायक दिशा देण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकते.

आजच्या काळातही विविध प्रश्नांवर आंदोलने होताना दिसतात. शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, महागाई, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सुरक्षा, स्थानिक विकासकामे, कामगारांचे प्रश्न अशा अनेक विषयांवर नागरिक आपला आवाज उठवतात. काही आंदोलनांना व्यापक जनसमर्थन मिळते, तर काही आंदोलनांचा प्रभाव मर्यादित राहतो. मात्र प्रत्येक आंदोलनामागे काही ना काही सामाजिक किंवा राजकीय कारण असते. त्यामुळे आंदोलन सुरू होण्यापूर्वी त्या प्रश्नाची मुळे समजून घेणे आवश्यक आहे.

आंदोलनाचे सर्वात मोठे सामर्थ्य म्हणजे सामूहिक आवाज. एखाद्या व्यक्तीची तक्रार प्रशासनाच्या पातळीवर दुर्लक्षित होऊ शकते; परंतु त्याच प्रश्नासाठी अनेक नागरिक एकत्र आले, तर प्रशासनाला त्याची दखल




घ्यावी लागते. लोकशाहीमध्ये जनमताला महत्त्व असल्यामुळे आंदोलन शासनाला निर्णयांचा पुनर्विचार करण्यास भाग पाडू शकते. अनेक सामाजिक सुधारणा आणि धोरणात्मक बदलांच्या मागे जनआंदोलनांची भूमिका राहिली आहे.

मात्र आंदोलन आणि अराजकता यामध्ये स्पष्ट सीमारेषा आहे. आपल्या मागण्या मांडण्यासाठी शांततामय मार्गाचा अवलंब करणे हा लोकशाही अधिकार आहे; परंतु सार्वजनिक मालमत्तेची तोडफफोड करणे, हिंसा करणे, सामान्य नागरिकांना त्रास देणे किंवा कायदा-सुव्यवस्थेला गंभीर धोका निर्माण करणे हा आंदोलनाचा योग्य मार्ग ठरू शकत नाही. आंदोलनाची ताकद त्याच्या हिंसक स्वरूपात नसून त्यामागील नैतिकता, तथ्ये आणि जनसमर्थनात असते.

आज सोशल मीडिया आंदोलनांना नवे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. काही मिनिटांत एखादा विषय हजारो-लाखो लोकांपर्यंत पोहोचू शकतो. हॅशटॅग, व्हिडिओ, ऑनलाइन मोहिमा आणि डिजिटल स्वाक्षरी अभियानांमुळे जनमत तयार करणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. मात्र या माध्यमासोबत जबाबदारीही आली आहे. अपुरी माहिती, अफवा किंवा चुकीच्या बातम्यांवर आधारित आंदोलन समाजात गैरसमज आणि तणाव निर्माण करू शकते. त्यामुळे आंदोलनाची सुरुवात करण्यापूर्वी तथ्यांची पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

काही वेळा आंदोलन हे राजकीय स्वार्थाचे साधनही बनते. जनतेच्या खऱ्या प्रश्नांपेक्षा राजकीय फायद्यासाठी आंदोलन उभे केले गेले, तर त्याचा परिणाम लोकशाहीवर विपरीत होऊ शकतो. आंदोलन करणाऱ्यांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे की, आपण कोणासाठी आणि कोणत्या उद्देशासाठी लढत आहोत? मागणी जनहिताची आहे का? तिच्यामागे पुरावे आहेत का? तिचा परिणाम समाजातील इतर घटकांवर काय होईल? या प्रश्नांची उत्तरे स्पष्ट असतील तर आंदोलनाला नैतिक बळ मिळते.

आंदोलनकर्त्यांइतकीच जबाबदारी शासनाचीही आहे. नागरिक रस्त्यावर उतरल्यावर त्यांना केवळ विरोधक म्हणून पाहणे योग्य नाही. आंदोलनामागील कारण समजून घेणे, प्रतिनिधींशी संवाद साधणे आणि योग्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेणे ही शासनाची जबाबदारी आहे. लोकशाहीमध्ये सरकार आणि जनता हे परस्परविरोधी घटक नसून एकाच व्यवस्थेचे भाग आहेत. त्यामुळे संघर्षापेक्षा संवादाला प्राधान्य दिल्यास अनेक प्रश्न शांततेने सुटू शकतात.

माध्यमांची भूमिकाही येथे महत्त्वाची आहे. आंदोलनाचे वृत्तांकन करताना केवळ गर्दी, घोषणाबाजी किंवा संघर्षाचे दृश्य दाखविण्यापेक्षा आंदोलनामागील मूळ प्रश्न जनतेसमोर आणला पाहिजे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# ईडीकडून अनिल अंबानी समूह कंपन्यांविरोधात आरोपपत्र दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली**– रिलायन्स अनिल अंबानी समूहाच्या कंपन्या आणि माजी अधिकाऱ्यांशी संबंधित दोन वेगवेगळ्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल केले आहे, असे अंमलबजावणी महासंचालनालयाने रविवारी सांगितले. पहिल्या प्रकरणात, द्वारका येथील पीएमएलए न्यायालयासमोर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, रिलायन्स समूहाचे माजी अधिकारी सतीश सेठ आणि इतरांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले.

या प्रकरणातील मुख्य आरोपपत्र ईडीने मार्च महिन्यात दाखल केले होते. पीएमएलए अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या या तक्रारीत आरकॉम, रिलायन्स टेलिकॉम लिमिटेड, 'राग'चे माजी अधिकारी सतीश सेठ आदींना नामांकित केले.

## नाशिक-पुणे थेट रेल्वेसाठी समृद्धी महामार्गावर ठिय्या

# 'हक्काची रेल्वे मिळेपर्यंत लढा सुरूच राहणार', आ.सत्यजीत तांबेंची ठाम भूमिका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी क्रांती दिनाचे औचित्य साधत रविवारी सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. आमदार सत्यजीत तांबे आणि खासदार राजाभाऊ वाजे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आंदोलकांनी समृद्धी महामार्गावर ठिय्या देत चक्काजाम आंदोलन केले.

नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी सरळ मार्गाला प्राधान्य देऊन प्रकल्पाबाबत तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी नाशिक-पुणे रेल्वेच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. हा रेल्वे प्रकल्प केवळ वाहतुकीचा प्रश्न नसून नाशिक,



अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांना महामार्गावरून बाजूला होण्याचे आवाहन केले. मात्र, नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गाबाबत शासनाने ठोस निर्णय घेईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका आंदोलकांनी घेतली. यावेळी पोलीस आणि आंदोलकांमध्ये काही काळ झटापट झाल्याची माहिती आहे.

नाशिक-पुणे सरळ रेल्वेमार्गामुळे नाशिक, सिन्नर, संगमनेर, आळेफाटा, नारायणगाव, मंचर, राजगुरुनगर, चाकण, आळंदी आणि पुणे या भागांना थेट जोडणी मिळण्यास मदत होणार आहे.

## आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या हस्ते

# जनकल्याण कार्यालय व समस्या निवारण केंद्राचे उदघाटन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – क्रांती दिनाचे औचित्य साधून शेंदुरजनाघाट मलकापूर येथील भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग क्रमांक ४ च्या नगरसेविका स्नेहल आकाश वघाळे यांच्या जनकल्याण कार्यालय व समस्या निवारण केंद्राचे उदघाटन आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या हस्ते व नगराध्यक्ष सुवर्णा वरखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.







यावेळी आमदार यावलकर यांनी या कार्यालयामुळे प्रभागातील नागरिकांच्या समस्याचे निराकरण करण्याकरिता मदत, मार्गदर्शक होईल व किरकोळ समस्या या कार्यालयाच्या माध्यमातून लवकरात लवकर सोडण्याकरिता मदत होईल तसेच प्रभागातील नागरिका सोबत संपर्क सुद्धा राहणार असल्याचे यावेळी सांगितले. या जनकल्याण कार्यालय व समस्या निवारण केंद्र माध्यमातून नागरिकांना रहवाशी दाखला, मृत्यू प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, रोड, नाली, पथदिवे व इतर समस्या निराकरण करण्यात येणार असून तसेच त्यांच्या इतर अडचणीकरिता सुद्धा या कार्यालयाच्या माध्यमातून त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे नगरसेविका स्नेहल वघाळे यांनी यावेळी सांगितले. या कार्यालयाच्या उदघाटनाला शिक्षण व आरोग्य सभापती निलिमा कुबडे, महिला बालकल्याण सभापती प्रिया नेपाल पाटील, नगरसेवक निलेश फुटाणे, पवन मोघे, हर्षल फुटाणे, नगरसेविका संगीता अकर्ते, कुमूद अळसपुरे, शितल होले यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# विद्यार्थिनींसाठी आरोग्य व स्वच्छता विषयक मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे महिला विकास मंच व नीमा विमेन्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापिका टी.सी.सायर होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ.मिना बंदे यांनी विद्यार्थिनींना पौगंडावस्थेतील शारीरिक, मानसिक व भावनिक बदल, आरोग्य व स्वच्छता, योग्य आहार, मानसिक स्वास्थ्य, आत्मविश्वास तसेच मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता याबाबत सविस्तर व शास्त्रीय मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली तसेच मंदा फोकमारे, सुप्रिया बंदे व ज्येष्ठ शिक्षिका मेघाविनी बडे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगला कुकडे यांनी केले.

डॉ.मिना बंदे यांनी विद्यार्थिनींनी पौगंडावस्थेतील बदलांकडे भीती किंवा संकोचाने न पाहता सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहन केले. या प्रसंगी विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिनचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून मासिक पाळीतील स्वच्छता, आरोग्याची काळजी आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत विद्यार्थिनींमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले. तज्ज्ञांनी त्यांच्या प्रश्नांना समर्पक व शास्त्रीय पद्धतीने उत्तरे देत शंकांचे निरसन केले.

त्यामुळे विद्यार्थिनींच्या मनातील अनेक गैरसमज दूर होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत झाली. अध्यक्षीय मार्गदर्शनातून सायर यांनी विद्यार्थिनींना आपल्या आरोग्याची काळजी घेत शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकासालाही महत्त्व द्यावे, असा संदेश देण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार शिक्षिका नंदिनी ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला विकास मंच व नीमा विमेन्स फोरम यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक जागरुकतेसाठी अत्यंत उपयुक्त व कौतुकास्पद ठरला.

# मनोज जरांगेंचे आरोप तथ्यहीन, बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या सूचना दिल्याच नाहीत : बीडच्या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – रेखा अंबुरे यांच्या कुणबी जात प्रमाणपत्रावरून सुरू असलेल्या वादाला आता बीड जिल्हा प्रशासनाने अधिकृत स्पष्टीकरण देत पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रातून मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांमध्ये केलेल्या आरोपांमध्ये तथ्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, रेखा अंबुरे यांचे कुणबी प्रमाणपत्र रद्द झाल्याचा दावा आणि महसूल मंत्र्यांच्या सूचनेनुसार प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, बीड प्रशासनाच्या





अहवालानुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कोणतेही कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्याच्या सूचना दिलेल्या नाहीत. मंत्र्यांकडून केवळ चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र प्राप्त झाले होते, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

रेखा अंबुरे नेमक्या कोण? रेखा अंबुरे या माजलगाव नगरपरिषदेच्या निवडणुकीत मागास प्रवर्ग महिला गटातून निवडून आल्या होत्या. त्यांच्या कुणबी प्रमाणपत्राशी संबंधित कागदपत्रे आणि नोंदीवरून वाद निर्माण झाला होता. या प्रकरणात अंबुरे यांनी मौजे खळवट लिमगावचा नमुना-३३ संकेतस्थळावर अपलोड करण्याची विनंती प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर त्यांच्या विनंतीनुसार संबंधित कागदपत्रांची चौकशी करण्यात आली. जिल्हा प्रशासनाकडून सविस्तर चौकशी रेखा अंबुरे यांच्या विनंतीनंतर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यात आली. या प्रक्रियेत अंबुरे यांच्याकडून प्रतिज्ञापत्र आणि शपथपत्रही घेण्यात आल्याचे निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर २४ जून रोजी मौजे खळवट लिमगावचा नमुना-३३ संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला.

## रक्तवीर संस्था व श्री संत गजानन नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने

# रक्तदान शिबीर : अनेकांचा सहभाग





(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – रक्तवीर सामाजिक बहुउददेशीय संस्था व श्री संत गजानन नागरी सहकारी पतसंस्था वरुडच्या वतीने शहरातील डॉ.खेरडे बालरुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री संत गजानन नागरी सहकारी पतसंस्था शहरासह तालुक्यात विविध सामाजिक कार्यामध्ये सहभाग घेत असते. अनेक रुग्णांना रक्ताची गरज असते आणि रक्त न मिळाल्यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले, हेच हेरुन श्री संत गजानन नागरी सहकारी पतसंस्थेने या रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

याप्रसंगी श्री संत गजानन नागरी सहकारी पतसंस्था वरुडचे अध्यक्ष प्रा.सुधाकर यावले, उपाध्यक्षा सुरेंद्र चांडक, संचालक प्रविण उपासे, प्रमोद गणोरकर, सतिश पानसे, संजय हेडाऊ, रमेश राऊत, संदीप अढाऊ, पुंडलिक हरले, डॉ.पंकज बिजवे, प्रभाकर तिमखेडे, कृष्णा चोबितकर, प्रतिभा देशमुख, प्रतिभा तिवारी, संस्थेचे व्यवस्थापक आकाश उघडे व कर्मचारी सोनू राजपूत, व इतर नितिन शिंगरवाडे, अशोक राऊत, निलेश कुबडे, अनिल चिंचमलातपुरे, सुनील कडू, डॉ.भुषणकुमार खेरडे, डॉ.ज्ञानदा खेरडे, जितेंद्र शेटीये, चेतन बरांगे, योगेश शिरुळकर, स्वाती राऊत, पल्लवी हुरडे, जगदीश अनासाने, गौरव बुरंगे, क्रांतीकुमार कडू, अनुप मांगलकर आदी उपस्थित होते.

## मध्यप्रदेशातील पचमढी येथील चौऱ्यागडावर दर्शनासाठी जाणाऱ्या

# हजारो शिवभक्तांसाठी भोजन व्यवस्था : युवकांचा पुढाकार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जय भोले भंडारा मागील १८ वर्षांपासून मध्यप्रदेशातील पचमढी येथील चौऱ्यागडाच्या पायथ्याशी चौऱ्यागडावर जाणाऱ्या शिवभक्तासाठी भंडाऱ्याचे आयोजन करत असते यावर्षी सुध्दा भंडाऱ्याचे आयोजन केलेले असून या भंडाऱ्यामध्ये यावर्षी पूर्ण जेवण पोळी, भाजी, भात, शिरा व उपवास असणाऱ्या भक्तांसाठी साबुदाणा उसळचे वाटप केले जाणार आहे.

श्रावण शुद्ध महिन्यातील नागपंचमीच्या चार दिवसाआधी १४ ते १७ ऑगस्ट या ४ दिवस सकाळी ८ वाजतापासुन महाप्रसाद वाटपाला सुरुवात करण्यात येणार आहे. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या पर्यटनस्थळी पंचमढी





चौऱ्यागडावर जाणाऱ्या शिव भक्तांसाठी जय भोले भंडारा सालाबादप्रमाणे यावर्षी सुद्धा सज्ज झाला आहे. भंडारा समितीच्या वतीने या भंडाऱ्यासाठी जय्यत तयारी सुरु झाली आहे.

शेंदुरजनाघाट येथील नगरपरिषद कॉम्युनिटीहॉल येथे गहू, तांदूळ, तेल, दाळ, साखर, रवा व इतर साहित्यासह देणगीदाराकडुन देणगी जमा करण्याच्या कार्याला सुरुवात करण्यात आली आहे. सार्वत्रिक लोकवर्गणीतून पार पडणाऱ्या भंडाऱ्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा चौऱ्यागडाच्या पहिल्या पायरी नजिक हजारो भक्तगणांना महाप्रसादाचे वितरण होणार आहे. अनेक सेवाकरी सतत ५ दिवस चालणाऱ्या या भंडाऱ्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विनामूल्य आपआपली जबाबदारी सेवा देवुन मोठ्या श्रद्धेने पार पाडणार आहे. भंडारा समितीच्या सर्व सभासदांकडून सुद्धा महिन्याभऱ्या आधीपासून भंडाऱ्याच्या नियोजनासंबधी समस्त कार्य पार पाडण्यासाठी लगभग सुरु झाल्याचे दिसत आहे.

यावर्षी भंडाऱ्याकरिता महिलांची गैरसोय टाळण्यासाठी विशेष कुत्रिम प्रसाधनगृहे समितीच्या वतीने निर्माण करण्यात आली आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश यासह विविध भागातुन येणाऱ्या लाखो शिवभक्तांसाठी मध्यप्रदेश प्रशासन सज्ज झाले आहे. जय भोले भंडाऱ्याच्या काही सदस्यांनी तेथील स्थानिक प्रशासनाची भेट घेत चौऱ्यागडाच्या पायथ्याशी जाऊन भंडाऱ्याच्या जागेची पाहणी केली आहे.

या भंडाऱ्याला सहकार्य करणाऱ्या दानदात्यानी नगरपरिषद कॉम्युनिटीहॉल येथे जय भोले भंडारा कार्यालय सुरु करण्यात आले आहे. देणगी स्वरुपात रोख रक्कम, विविध धान्यासह, इंधन, साबुदाणा, तेलाचे पिंपे, साखर यासह विविध दान जमा करण्याचे कार्य सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे भंडाऱ्याला सहकार्य करणाऱ्यांनी १२ ऑगस्ट पर्यंत देणगी जमा करण्याचे आवाहन जय भोले भंडारा समितीच्या वतीने परिसरातील करण्यात आले आहे.

# झेड+ सुरक्षा असतानाही ममता बॅनर्जींच्या कारवर चिखल आणि गाळ फासला, काहींनी तर चपला आणि दगडही फेकले

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर कारवर दगडफेक करण्यात आली.

जमावाने पोलिसांसमोर कार थांबवून त्यावर चिखल आणि गाळ फासला. काहींनी तर चपला आणि दगडही फेकले. जर गाडीची खिडकी उघडी असती, तर त्यांचे डोके फुटले असते आणि त्यात मृत्यूही झाला असता, असा गंभीर आरोप ममता यांनी केला. टीएमसी कार्यकर्त्यांच्या निधनानंतर ममता बॅनर्जी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील त्याच्या कुटुंबीयांना भेटायला जात होत्या. वाटेत, बिजापूरजवळ स्थानिक जमावाने चोर, चोर अशा घोषणा देत त्यांचा ताफा थांबवला. संपूर्ण पश्चिम बंगाल गुंडांच्या ताब्यात

ममता बॅनर्जी म्हणाल्या, 'माझ्या गाडीवरील हल्ला हा एक कट आहे. मी इथे येणार असल्याची माहिति पोलिसांना दिली होती, तरीही पोलिसांनी कोणतीही सुरक्षा व्यवस्था केली नाही.

संपूर्ण पश्चिम बंगाल गुंडांच्या ताब्यात आहे.' तृणमूल काँग्रेसचे (टीएमसी) कार्यकर्ते बिरजू केओट यांच्या निधनानंतर ममता बॅनर्जी त्यांच्या कुटुंबीयांना भेटायला आल्या होत्या. हलीशहर पो-लीस कोठडीत असताना प्रकृती खालावल्याने बिरजू यांचे निधन झाले

## न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे

# पालक-शिक्षक सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे आज पालक-शिक्षक सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ तथा शाळा समिती सदस्य डॉ.विजय देशमुख व न्यू इंग्लिश हायस्कुलचे मुख्याध्यापक अशोक चौधरी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पालक-शिक्षक सभेला सुरुवात झाली. यावेळी मुख्याध्यापिका कोमल पांडव यांनी पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन केले. सभेदरम्यान पालकांनी विद्यार्थ्यांशी संबंधित विविध अडचणी व समस्या मांडल्या. शिक्षकांनी पालकांच्या प्रश्नांचे निराकरण करून त्यांना योग्य मार्गदर्शन केले. पालक व शिक्षक यांच्यातील संवादातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

या पालक-शिक्षक सभेमुळे शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला. सभेला पालक, शिक्षक व मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# पेठ रोडवरील मॅनहोलमध्ये आढळला कुजलेल्या अवस्थेत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिकच्या पेठ रोडवरील पिंगळे फार्म आणि सप्तरंग सोसायटी परिसरात रविवारी सकाळी एका मॅनहोलमध्ये अज्ञात व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच म्हसरूळ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मॅनहोलमधून मृतदेह बाहेर काढून पुढील कार्यवाहीसाठी शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

मृतदेह मोठ्या प्रमाणात कुजलेल्या अवस्थेत असल्याने तसेच चेहरा विद्रूप झाल्यामुळे मृत व्यक्तीची ओळख पटविण्यात पोलिसांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. दरम्यान, संबंधित व्यक्ती मॅनहोलमध्ये नेमकी कशी पडली? तिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला?

ही घटना अपघाती आहे की यामागे अन्य काही कारण आहे? या सर्व बाबींचा तपास म्हसरूळ पोलीस करत आहेत.

## इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत

# नॅशनल इंग्लिश स्कूलच्या ३ विद्यार्थ्यांचे यश

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – मागील वर्षी झालेल्या इयत्ता ४ थी शिष्यवृत्ती परीक्षेत नॅशनल इंग्लिश स्कूल येथील रियांश पाठक, यशित चाफले आणि भाग्येश भुयार या ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यशाबद्दल शाळेत आनंदाचे वातावरण आहे.

निवड झालेले विद्यार्थी त्यांच्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना आणि शाळेतील शिक्षकांना दिले. त्यांनी सांगितले की, शिक्षकांच्या मार्गदर्शन आणि पालकांच्या पाठिंब्यामुळे हे यश मिळवणे शक्य झाले.



यावेळी मुख्याध्यापक विनोद भोंगाडे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. 'पुढेही तुम्ही अशीच प्रगती करत राहा आणि शाळेचे नाव उज्ज्वल करा' अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

शाळेतील इतर शिक्षक वर्गाने देखील या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

नॅशनल इंग्लिश स्कूल नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. शिष्यवृत्ती परीक्षेतील हे यश त्याचेच प्रतीक आहे.

## न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे

# शालेय मंत्रिमंडळाचा शपथविधी कार्यक्रम उत्साहात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे शालेय मंत्रिमंडळाचा शपथविधी कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि संसदीय कार्यपद्धतीची ओळख निर्माण व्हावी, या उद्देशाने शालेय मंत्रिमंडळाची निवडणुक घेण्यात आली होती. निवडुन आलेल्या विद्यार्थी मंत्रिमंडळाचा शपथविधी यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक चौधरी होते. प्रमुख अतिथी म्हणुन किशोर मांडेकर व सविता ठाकरे उपस्थित होत्या. याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक चौधरी यांनी बाल मित्रमंडाळाला कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव करुन दिली. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी आपल्या पदाची शपथ घेतली.




कार्यक्रमाचे नियोजन मेघाविना बढे व वैशाली खोटरे यांनी केले. तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा व जबाबदारीने आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्याचा संकल्प केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेचा अनुभव मिळाला असून शाळेच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा मिळाली.

# २०१५ पूर्वीच्या एकतर्फी मध्यस्थांच्या नेमणुका आपोआप रद्द ठरत नाहीत - मुंबई उच्च न्यायालय

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – २३ ऑक्टोबर २०१५ पूर्वी एकाच पक्षाने एकतर्फी नियुक्त केलेला मध्यस्थ मध्यस्थी करारातच अशी परवानगी असल्यास बेकायदेशीर



मानला जाणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे.

'एसइ इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड' (आता 'पैसालो डिजिटल लिमिटेड') शी संबंधित चार अंमलबजावणी याचिकांवर सुनावणी करताना न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी ४ ऑगस्टला हा निकाल दिला. २०१५ मधील कायद्यातील दुरुस्तीपूर्वी मध्यस्थांची नियुक्ती एकतर्फी झाली होती, या कारणावरून अंमलबजावणी न्यायालय मध्यस्थी निवाड्याची अंमलबजावणी नाकारू शकते का, हा मुख्य प्रश्न न्यायालयासमोर होता.

न्यायालयाने नमूद केले की, २३ ऑक्टोबर २०१५ पूर्वी काही विशिष्ट परिस्थितींमध्ये एकतर्फी नेमणुकांना न्यायालयांनी मान्यता दिली होती. मध्यस्थी करारात विशिष्ट मध्यस्थाचे नाव असणे, विशिष्ट पदनिर्देशित व्यक्तीची नियुक्ती असणे किंवा एका पक्षाला मध्यस्थ नियुक्त करण्याचा अधिकार दिलेला असणे अशा प्रसंगांचा समावेश होता.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय**

**क्र.प्रस्तु-१/कावी-३३५/२५-२६ दि.०३/०७/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **हरिचंद्र लक्ष्मण भोरे, रा.आमपेंड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत, एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार **स्वत: नामे हरिचंद्र लक्ष्मण भोरे, रा.आमपेंड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.२७/०४/१९६७** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी ०३/०७/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६३७/२०२६ ने.ता.३१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) रेखा गणेश गणोरकर, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम
२) दिप गणेश गणोरकर, वय अं.६७ वर्ष, धंदा- शिक्षण
अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे गणेश मारोतराव गणोरकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.३१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०४/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३२/२०२६ ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-**

प्रकाश महादेवराव चौधरी
वय अं.५८ वर्ष, धंदा-शेती
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे महादेव बाकारामजी चौधरी व लिलाबाई महादेवराव चौधरी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०४/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.जे.एस.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६५९/२०२६ ने.ता.०४/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रभाकर महादेव पाटणे, वय अं.७५ वर्ष, धंदा-मजुरी
२) ईश्वर महादेवराव पाटणे, वय अं.६७ वर्ष, धंदा- सेवानिवृत्त
अर्जदार क्र.१ रा.दुर्गा, ता.दुर्गा (छत्तीसगढ)
क्र.२ रा.चांदस वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे पार्वताबाई महादेवराव पाटणे, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०४/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०४/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# वरुड ही माझी कर्मभुमी, सन्मान मी नम्रतेने स्विकारतो

## विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी यांचे प्रतिपादन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)







**वरुड** – वरुड मित्र परिवाराने केलेल्या या आत्मीय सत्काराबद्दल मी मनःपूर्वक कृतज्ञ आहे. आपले प्रेम, आशीर्वाद आणि सहकार्य यापुढील वाटचालीत माझी ताकद राहील, वरुड मित्रपरिवार सत्कार समितीच्या वतीने आयोजित हा सत्कार माझ्यासाठी विशेष आनंदाचा आणि भावनिक क्षण आहे. वरुडच्या साहित्यप्रेमी नागरिकांनी दाखवलेले प्रेम आणि आपुलकी ही माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. हा सन्मान मी अत्यंत नम्रतेने स्वीकारतो, असे प्रतिपादन जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, वनराईचे सर्वेसर्वा, माजी आमदार तथा विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी यांनी केले.

जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार डॉ.गिरीश गांधी विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत बहुमतांनी निवडून आल्याबद्दल वरुड मित्र परिवारातर्फे शहरातील अष्टविनायक सभागृह येथे सत्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मला बहुमताने विजयी करून माझ्यावर जो विश्वास व्यक्त केला, त्याबद्दल मी सर्व साहित्यिक, लेखक, कवी, रसिक व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानतो. हा विजय केवळ माझा नसून विदर्भातील साहित्यप्रेमी जनतेचा आणि साहित्य चळवळीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाचा आहे.

विदर्भाची भूमी ही साहित्य, संस्कृती, कला आणि सामाजिक जाणीवांची समृद्ध परंपरा लाभलेली भूमी आहे. या भूमीतील नवोदित लेखकांना, कवींना आणि साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे आणि मराठी साहित्याची समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, यासाठी माझे सातत्याने प्रयत्न राहतील.

साहित्य हे समाजाला दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे साहित्यिकांनी समाजातील वास्तव, सामान्य माणसाचे प्रश्न, सामाजिक परिवर्तन आणि मानवी मूल्ये आपल्या लेखणीतून मांडली पाहिजेत. साहित्य आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. माझ्यावर व्यक्त केलेल्या विश्वासाला न्याय देण्यासाठी मी प्रामाणिकपणे कार्यरत राहीन. विदर्भाच्या साहित्यिक चळवळीला नवी ऊर्जा देत सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा माझा प्रयत्न असेल, असेही डॉ.गिरीश गांधी म्हणाले.

हा सत्कार सोहळा ज्येष्ठ राष्ट्रीय पत्रकार अशोक वानखडे यांचे हस्ते व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते.
या सत्कार सोहळयाप्रसंगी सर्वश्री आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे अधिष्ठाता डॉ.कोमल ठाकरे, नागपुर येथील माधवराव देशपांडे, अरुणा सबाने, जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष संतोष क्षिरसागर, सचिव डॉ.मनोहर आंडे, सहसचिव प्रा.अरुण वानखडे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी हर्षवर्धन देशमुख, ईश्वर सलामे, नरेशचंद्र ठाकरे, डॉ.कोमल ठाकरे, उमेश उर्फ चंदु यावलकर, अरुणा सबाने, अशोक वानखडे आदींची भाषणे झालीत.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजन समितीचे प्रा.अरुण वानखडे, नगरसेवक योगेश्वर खासबागे, देवेंद्र बोडखे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक वासुदेव लांडगे, प्रा.अरुण खेरडे, प्रा.सुभाष बारस्कर, प्रा.व्ही.आर.देशमुख, प्रा.पी.के.वानखडे, प्रा.अरुण कावनपूरे, सेवानिवृत्त प्राचार्य प्रमोद गणोरकर, शशिकांत बेलसरे, पुरुषोत्तम कळमकर, रामराव वानखडे, बाजार समिती माजी उपसभापती निळकंठ आंडे, माजी जि.प.सभापती गिरीश कराळे, हिवसे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर तडस, चंद्रकांत चांगदे, डॉ.माधवराव पानसे विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन ठाकरे, सुरेश नरहरे, प्रा.अश्वपाल वानखडे, मदन नरहरे, आशिष कुबडे, उद्योजक जितेंद्र शाह, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष रितेश शाह, अनिल सुपले, अजय राठी, माजी नगरसेवक संजय कानुगो, हरिष कानुगो, व्यावसायिक गिरीश राठी, सुरेंद्र चांडक, पराग पनपालिया, श्याम खंडेलवाल, कन्नुभाई पटेल, संध्या सराटकर, रेखा आजनकर, डॉ.माया आंडे, उषा चौधरी, मंदा केवटे, ए.एम.देशमुख, के.एम.चौधरी, डॉ.मनोहर आंडे, संतोष क्षिरसागर, राजेश गांधी, रोशन माखिजा, निलेश रडके, मनोज गुल्हाने, सतीश बहुरुपी, शैलेंद्र देशमुख, मोहन साबू, नंदकिशोर टाकरखेडे, डॉ.विजय देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे संचालन विदर्भ साहित्य संघाचे नवनिर्वाचित संचालिका शुभदा फडणवीस, सत्कारमुर्तीचा परिचय डॉ.मनोहर आंडे, प्रास्तविक प्रा.अरुण वानखडे तर उपस्थितांचे आभार प्रा.किशोर तडस यांनी मानले.

कार्यक्रमाला डॉ.गिरीश गांधी यांचा मित्रपरिवार, जागृत परिवारातील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील नागरिक, महिला व अनेकांनी मान्यवरांनी हजेरी लावली होती.

### आजी माजी आमदारांची टोलेबाजी

“ या व्यासपीठावर तीन वेगवेगळ्या विचारसरणीचे आणि वेगवेगळ्या पक्षांचे आजी–माजी आमदार एकत्रित आले होते. त्यातील हर्षवर्धन देशमुख आणि नरेशचंद्र ठाकरे यांनी एकमेकांवर चांगलीच टोलेबाजी केली आणि सभागृहामध्ये चांगलाच हशा निर्माण झाला होता. हर्षवर्धन देशमुख यांनी ‘आज मी आजारी असल्यामुळे जास्त बोलु शकणार नाही, मी आजारी आहे, मात्र रिटायर होणार नाही’ अशी टोलेबाजी नरेशचंद्र ठाकरे यांच्यावर केली तर नरेशचंद्र ठाकरे यांनी ‘माणसाचे मन स्वच्छ आणि निर्माण निर्मळ असले तर माणुस आजारीच पडत नाही’ असे टोलेबाजी हर्षवर्धन देशमुख यांच्यावर केली, त्यामुळे सभागृहात चांगलाच अशा पिकला होता.

# बिल्डरांच्या नादी लागून या लोकांनी महाराष्ट्र १० वर्षे मागे नेला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

## गणेश नाईकांचा एकनाथ शिंदेंवर अप्रत्यक्ष निशाणा



**मुंबई** – वनमंत्री गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर पुन्हा एकदा अप्रत्यक्षपणे जोरदार निशाणा साधला आहे. ‘बिल्डरांच्या नादी लागून या लोकांनी महाराष्ट्र १० वर्षे मागे नेला आहे. माझं कोणत्या व्यक्तीशी वाद नाही.

मात्र, जनतेला गृहीत धरून जनता सहन करेल, असा समज ठेवून कोणी नाटक करेल तर त्याच्या नाटकाचा तमाशा कसा आहे हे दाखवायचं काम गणेश नाईक करेल,‘ अशी अत्यंत खरमरीत टीका नाईक यांनी केली आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून गृहराज्यमंत्री योगेश कदम आणि ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. सानपाडा येथील कार्यक्रमात बोलताना गणेश नाईक म्हणाले की, ‘कॉलनीमध्ये २० वर्षांपूर्वी बांधलेल्या घरांची पुनर्बांधणी ही पुनर्विकासाऐवजी क्लस्टर योजनेमधून होत असेल तर ते या शहरासाठी फार घातक आहे. स्वतःच्या फायद्यासाठी यांनी बिल्डरांच्या नादी लागून महाराष्ट्र दहा वर्षे मागे नेला आहे. कॉलनी भागातील इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी क्लस्टर योजना लागू करणे हे बिल्डरांच्या घशात पैसे घालण्यासारखे आहे.

मात्र कुणी जर असा प्रयत्न केला तर त्यांच्या घशातून पैसे काढण्यात येतील. जनतेला गृहीत धरून कुणी नाटक करणार असेल तर त्या नाटकातील तमाशा काय आहे, हे माझ्याकडून जनतेला दाखवण्यात येईल.

आम्हाला बुद्धू समजून टपली मारणार असाल तर त्याचा हात धरून त्याची लायकी दाखवण्याची ताकद माझ्यात आहे,‘ असा थेट इशारा त्यांनी दिला. आदित्य ठाकरेंची एकनाथ शिंदेंवर टीका गणेश नाईक यांच्या वक्तव्याबाबत विचारले असता ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केलाय.

# झारखंडमध्ये आज काय होणार? आंदोलक विद्यार्थी विधानसभेवर धडकणार, पोलिसांकडून दिल्ली पोलिसांची 'कॉपी' करत अभूतपूर्व सहा-स्तरीय बॅरिकेड्सची घेराबंदी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**रांची** – झारखंडमध्ये, पीएससी–एसएससी परीक्षेतील गैर प्रकारांविरोधात गेल्या १७ दिवसांपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. विद्यार्थी आज (१० ऑगस्ट) रांचीमधील मोराबादी मैदानापासून विधानसभेला घेराव घालणार आहेत. काल रात्री उशिरापासून ५ हजारहून अधिक विद्यार्थी जयपाल सिंग मुंडा स्टेडियमवर दाखल झाले आहेत. विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. विविध ठिकाणी काटेरी तारांचे कुंपण घालण्यात आले आहे. पोलिसांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६३ अंतर्गत कारवाई केली आहे. सुरक्षेचे तीन स्तर तैनात करण्यात आले आहेत. विद्यार्थी आंदोलनाच्या ठिकाणी आणि विविध ठिकाणांवर पाळत ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वापर केला जात आहे. विधानसभेच्या मुख्य प्रवेशद्वाराला बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. परिसराच्या २ किलोमीटरच्या परिघात पाण्याचे फवारे मारणारी वाहने तैनात करण्यात आली आहेत. इतर जिल्ह्यांतूनही पोलीस दलांना पाचारण करण्यात आले आहे.

विधानसभा घेरावातील ठळक मुद्दे विद्यार्थ्यांना रोखण्यासाठी सहा–स्तरीय बॅरिकेड्स उभारले रांचीमध्ये २,००० सैनिक तैनात विविध ठिकाणी नियंत्रण व्हॅन तैनात अश्रुधूर आणि पाण्याच्या फवाऱ्यांची व्यवस्था केली जुन्या विधानसभा परिसरात विद्यार्थ्यांची गर्दी हजारीबागहून रांचीला येणाऱ्या बसेस थांबवल्या सीबीआय चौकशीवर कोणताही करार नाहीदरम्यान, रविवारी, विद्यार्थी आणि सरकार यांच्यात चर्चेची तिसरी फेरी पार पडली.

